# इतरांना सहाय्य करणे

चांगल्या शोमरोन्याने अनोळखी व्यक्तीला मदत केली

**प्रार्थना:** "हे आमच्या पित्या उपयुक्त मार्गाने आमच्या गरजू शेजाऱ्यांवर प्रीती करण्यास आमचे साहाय्य कर"

मुलांची पार्श्वभूमी आणि स्थानिक रिवाज यानुसार कार्यक्रम निवडा. पाहा लूक 10:25-37 मध्ये लोक अनोळखी असले किंवा आपल्याला आवडत नसले तरी आम्ही इतरांशी कसे वागावे अशी देवाची इच्छा आहे.

- शिक्षकांनी किंवा मोठया मुलाने लूक 10:25-37 मधून चांगल्या शोमरोन्याचा कथावृत्तांत सांगावा.
- स्पष्टीकरण करा जखमी झालेला माणूस यहूदी होता तर शुश्रुषा करून प्रेम दाखवणारा शोमरोनी होता दोघेही भिन्न भिन्न वंशाचे होते. यहूदी आणि शोमरोनी लोक एकाच प्रातांत राहात असले तरी एकमेंकाचे वैरी होते.



- मुलांना विचारण्यासाठी प्रश्न:

1. शोमरोनी मनुष्य येण्यापूर्वी त्या जखमी माणसाच्या बाजूने किती जण आले गेले?
2. याजक व लेवी ही दोन धर्मिक माणसे त्याच्याच वंशाची म्हणजे यहूदी होते ते मदत करण्यास का थांबले नसावेत असे तुम्हांला वाटते?
3. शोमरोनी मनुष्य निराळया वंशाचा होता आणि जखमी माणसाच्या लोकांशी त्याचे भांडण होते. त्याला त्या जखमी माणसाविषयी काय वाटले?
4. शोमरोनी मनुष्याने त्या माणसासाठी काय केले?
5. या कथावृत्तांत्तातील कोणाचे उदाहरण आम्ही आदर्श म्हणून समोर ठेवावे असे येशूने सांगितले?

लूक 10:25-37 मधील चांगल्या शोमरोन्याच्या कथावृत्तांत्ताचे नाट्यीकरण करा. नाटिकेची चांगली तयारी करून मग ती उपासनेच्या वेळी मोठया माणसासमोर सादर करा कथावृत्तांत्त साभिनय सादर करा. तुम्हांला मोठया माणसांची मदत घेता येईल

- लहान मुलांनी चोर लुटारू, जखमी यहूदी माणूस याजक व लेवी यांच्या भूमिका कराव्यात. त्यांच्यासाठी संवाद नाहीत त्यांनी फक्त मूकाभिनय करायचा आहे.
- यामध्ये अखेरीस फक्त शोमरोनी माणून व उतारशाळेचा मालक यांच्यातील संवाद आहे. शोमरोनी उतारशोळच्या मालकाला म्हणतो, "हयाची काळजी घ्या आणि जे काही अधिक खर्चाल ते मी परत आल्यावर तुम्हांला देईन. "हे सर्व तुम्हांला मूकाभिनयातूनही दाखवता येईल.
- सराव करण्यासाठी शास्त्रभाग वाचा आणि नाटिकेत काम करणाऱ्यांनी अभिनय करावा. संवाद न म्हणता तुमच्या चहऱ्यावरील हा भाव आणि कृती हालचाल यातून तुम्हांला काय म्हणायचे आहे ते समजले पाहिजे.



- दोन मोठया मुलांनी किंवा प्रौढ माणसांनी गाढव आणि चांगला शोमरोनी ह्या भूमिका करण्यात गाढवाची भूमिका करणाऱ्याच्या पाठीवर ब्लँकेट टाका जुन्या चिंध्यांची शेपटी लावा आणि डोक्याला कापडाचे किंवा पुठ्ठयाचे कान लावा गाढवाने “आ अू” असा मधून मधून आवाज काढावा
- कोणत्या कथावृत्तांत्ताचे नाट्यीकरण केले जात आहे हे मोठया माणसांना सांगू नका त्यांना ओळखण्यासाठी वेळ द्या.

गाढवाचे चित्र काढून ह्या जीवनातील एकमेकांचे संकटांचे ओझे वाहण्यास आपल्याला एकमेकांची कशी मदत करता येते ते स्पष्ट होते असे सांगा.

**कविता** तीन मुलांना स्तोत्र 41:1-3 यातून प्रत्येकी एकेक वचन म्हणण्यास सांगा:

जो दीनांची चिंता वाहतो तो धन्य!<br>
संकटसमयी परमेश्वर त्याला मुक्त करील.<br>
परमेश्वर त्याचे रक्षण करील व त्याचा<br>
प्राण वाचवील भूतलावर तो सुखी होईल<br>
आणि तू त्याला त्याच्या वैऱ्यांच्या इच्छेवर सोडणार नाहीस.<br>
तो रोगाने अंथरूणास खिळला असता<br>
परमेश्वर त्याला संभाळील; तो रोगी असता<br>
तू त्याचे अंथरूण बदलितोस.

**प्रात्यक्षिक**



- एक मेणबत्ती पेटवून टेबलावर ठेवा
- मेणबत्तीचा प्रकाश झाकण्यासाठी त्यावर बॉक्सचे वा अन्य कशाचे तरी झाकण घाला आग लागणारी वस्तू वापरू नका.
- मत्तय 5:14-16 वाचून मग मेणबत्तीवरचे झाकण काढा देवाविषयी वाटणाऱ्या अकृमित्र प्रेमामुळे आपल्याला गरजू लोकांची सेवा करण्याची प्रेरणा मिळते.

**पाठ करा मत्तय 5:16**

**प्रार्थना:**

“हे पित्या आमच्या आसपास असणाऱ्या लोकांच्या गरजा पाहण्यास आमचे साहाय्य कर ते आमच्या ओळखीचे असोत वा नसो त्यांना तत्काळ मदत करण्यासाठी आमचे साहाय्य कर. त्यांना उपयुक्त मार्गाने प्रेम दाखवण्यास आमचे साहाय्य कर मित्र वा कुटुंब अगदी शत्रूंवरही प्रेम करण्यास आम्हांला मदत कर. येशूच्या नावात मागितले म्हणून ऐक आमेन.”

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net